लोकमत

बुधवार, दि. २ ऑक्टोबर २०२४



आजरा महाविद्यालयात झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक विवेकानंद कॉलेजच्या संघाला फिरता चषक देताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, शरद भुताडिया, अशोक चराटी आदी मान्यवर यासह अन्य

# युवा महोत्सवात विवेकानंद महाविद्यालयास विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**आजरा :** आजरा येथे झालेल्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात वैयक्तिक व सांघिक या दोन्ही स्पर्धा प्रकारात कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले.

स्पर्धेतील सर्व विजेत्यांना ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेते शरद भुताडिया, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. डी. टी. शिर्के, जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व फिरता गौरव चषक देऊन गौरविण्यात आले. निकाल जाहीर होताच विजेत्या संघांनी ढोल, हलगी वादन व डॉल्बीच्या ठेक्यावर नृत्य करीत आनंदोत्सव साजरा केला.

युवा महोत्सव म्हणजे नुसताच कलाविष्कार नसून तो आत्माविष्कार आहे. युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते, असे कुलगुरू प्रो. डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. युवकांनी आपल्यातील सुप्त कला गुणांना ओळखून त्याला कलाक्षेत्रात एक वेगळे महत्त्व प्राप्त करून द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते शरद भुताडिया यांनी सांगितले.

कार्यक्रमास जनता एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष विलास नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, सचिव रमेश कुरुणकर, संचालक सुरेश डांग, विजयकुमार पाटील, कृष्णा येसणे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. टी. एम. चौगले, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, विद्यापीठ युवा महोत्सव समितीचे सदस्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.डॉ. अशोक बाचुळकर यांनी केले. तर आभार कार्यालयीन अधीक्षक योगेश पाटील यांनी मानले.

02/10/2024

2/10/2024

पुढारी

बुधवार, २ ऑक्टोबर २०२४

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजची बाजी

## आजऱ्यात ४४ व्या मध्यवर्ती महोत्सवाची जल्लोषी सांगता

**आजरा : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व आजरा महाविद्यालय यांच्या संयुक्तपणे आयोजित ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजने शास्त्रीय नृत्य, नकला, व्यंगचित्र स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून विविध स्पर्धेत प्रावीण्य मिळवून मोहोर उमटवली. यावेळी कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांतील गाडगे महाराज, सावित्रीबाई फुले, विलिंग्डन, कर्मवीर भाऊराव पाटील आदी विजेत्या संघांनीही प्रावीण्य मिळवून जल्लोष केला.



**आजरा : युवा महोत्सवाचे बक्षीस स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अभिनेते शरद भुताडिया, रावी किशोर, अशोक चराटी आदी.**

यावेळी ज्येष्ठ सिने व नाट्य अभिनेते शरद भुताडिया, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. टी. एम. चौगले, मनीषा नायकवडी, शुभांगी दुबे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शास्त्रीय नृत्य स्पर्धेत विवेकानंद कॉलेज (प्रथम), दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय), नकला स्पर्धेत विवेकानंद कॉलेज (प्रथम), मथुरा गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली व डीकेटीई टेक्स्टाईल अँड इन्स्टिट्यूट इचलकरंजी (द्वितीय), एकपात्री अभिनयामध्ये सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा (प्रथम), शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), कर्मवीर भाऊराव पाटील, इस्लामपूर (तृतीय) यांनी क्रमांक मिळविले. एकूण ५३ स्पर्धांमध्ये ३ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन चमक दाखवली.

यावेळी भुताडिया, कुलगुरू डॉ. शिर्के, अभिनेत्री रावी किशोर, जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी आदींच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी रमेश कुरुणकर, विलास नाईक, डॉ. अनिल देशपांडे, ज्योत्स्ना चराटी, प्रा. विजय बांदेकर, अनिकेत चराटी, डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. एस. जी. परूळेकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अशोक बाचूळकर यांनी सूत्रसंचालन केले. अधीक्षक योगेश पाटील यांनी आभार मानले.

पुढारी
शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४

# 'विवेकानंद'च्या ग्रंथालयात 'क्युआस' मशिन कार्यरत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमधील ग्रंथालयात पुस्तके ऑनलाईन जमा करणाऱ्या ऑटोमॅटिक 'क्युआस' मशिनचे उद्‌घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. मशिनमध्ये विद्यार्थ्यांनी नावावर घेतलेली पुस्तके बारकोड स्कॅनरद्वारे आपोआप जमा केली जातात. यामध्ये विद्यार्थ्यांचा वाचकांचा, सेवकांचा वेळ वाचतो. पश्चिम महाराष्ट्रातील ग्रंथालयांमध्ये हे मशिन प्रथमच आले आहे. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम संयोजनासाठी रजिस्ट्रार आर. बी. जोग, राजू साळुंखे आदींचे सहकार्य लाभले.

05/10/2024

5/10/24

पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि विज्ञान विभागाचे अधिष्ठता प्रा. डॉ. ए. एस. कुंभार यांच्या हस्ते झाले. उपक्रमांतर्गत रांगोळी, भाषण, निबंध, पोस्टर, वन्यजीव फोटो स्पर्धा, हस्तकला प्रतिकृती, लघुपट, हाताने रंगविण्याच्या स्पर्धा तसेच प्रश्नमंजूषा स्पर्धा झाल्या. यात १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धा परीक्षक म्हणून प्रा. वृषाली मिसाळ , डॉ. कोमल भिसे, डॉ. ई. बी. आळवेकर, एस. जी. कुलकर्णी, ऋषीकेश गोनी सतीश उपळावीकर, डॉ. आर. वाय. पाटील यांनी काम पाहिले.

# तरुण भारत

कोल्हापूर

www.tarunbharat.com

गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४


# विद्यापीठ युवा महोत्सवात सलग १६ वर्षे विवेकानंद अव्वल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आजरा महाविद्यालय, आजरा येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध १६ कला प्रकारात पुरस्कार प्राप्त करुन विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये अभिजीत कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक, सरदार बाबासाहेब माने फिरता चषक, वैयक्तिक फिरता गौरव चषक, नृत्य विभाग फिरता गौरव चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक मिळविण्याचा बहुमानही पटकावला.

मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रश्नमंजुषा प्रथम, भारतीय समुहगीत प्रथम, पाश्चिमात्य समुहगीत प्रथम, लोकनृत्य प्रथम, शास्त्रीय नृत्य प्रथम, नकला प्रथम, व्यंगचित्र प्रथम, पाश्चिमात्य एकल वादन व्दितीय, हिंदी वक्तृत्व – व्दितीय, स्थळ चित्रण व्दितीय, सांघिक रचनाकृती व्दितीय, लोकसंगीत वाद्यवृंद तृतीय, लोकवाद्य एकल वादन उत्तेजनार्थ, पाश्चिमात्य एकल गायन उत्तेजनार्थ या कलाप्रकारात पारितोषिके प्राप्त केली. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सांस्कृतिक विभागातील या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्वात प्रथम क्रमांक पटकावलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासोबत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सर्व प्राध्यापक.

साळुंखे म्हणाले, गेली सोळा वर्षे विवेकानंद महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये जनरल चॅम्पियनशीप पटकावत आहे. ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांचे कष्ट, तयारी , शिक्षकांचे उत्कृष्ठ मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाले आहे.

या यशाबद्दल सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात , सदस्य डॉ. राजश्री पाटील, प्रा. एस. एस. कदम, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. संदीप पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. संपदा टिपकुर्ले, प्रा. सतीश उपळावीकर, संगीत शिक्षक महेश हिरेमठ व प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे , प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी कौतुक केले.

तरुण भारत
बुधवार, १६ ऑक्टोबर २०२४

17/10/2024
17-10-24

# विवेकानंदमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील ग्रंथालय, मराठी, एन.सी.सी. व एन. एस.एस. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन' साजरा केला. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणाऱ्या मजकूराचे वाचन केले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे या मार्गदर्शन होते. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमपूजनाने सुरूवात झाली. यावेळी डॉ. नीता पाटील, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. सुनीता भोसले, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. रोहिणी रेळेकर, प्रा. अभिजित कदम, प्रा. योगेश माने, आर. बी. जोग होते.

पुढारी ५

गुरुवार, १७ ऑक्टोबर २०२४

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज १६ वर्षे अव्वल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजरा महाविद्यालय, आजरा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध कला प्रकारात पुरस्कार मिळवित युवा महोत्सवात सलग १६ वर्षे अव्वल येण्याचा बहुमान पटकावला आहे.

यामध्ये अभिजित कदम सांघिक स्पर्धा, जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक, सरदार बाबासाहेब माने फिरता चषक, वैयक्तिक फिरता गौरव चषक, नृत्य विभाग फिरता गौरव चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक मिळवला.

युवा महोत्सवात प्रश्नमंजुषा, समूहगीत, पाश्चिमात्य समूहगीत, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, एकल वादन, हिंदी वक्तृत्व, स्थळ चित्रण, सांघिक रचनाकृती, लोकसंगीत वाद्यवृंद, लोकवाद्य एकल वादन आदी कलाप्रकारात पारितोषिके मिळवली. यशाबद्दल कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. आरिफ महात, डॉ. राजश्री पाटील, प्रा. एस. एस. कदम, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. संदीप पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, २० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद कॉलेजच्या १६१ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयाच्या १६१ विद्यार्थ्यांची पुणे येथील नामांकित कंपनीत निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ॲप्टिट्यूड व सॉफ्ट स्कीलचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा टेलिफोनिक इंटरव्ह्यू घेण्यात आला. त्यातून संबंधित विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद
रविवार, २० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंदच्या १६१ विद्यार्थ्यांची कंपनीत निवड

## विवेकानंद शिक्षण संस्थेकडून अभिनंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) कोल्हापूरच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून जी. टी. टी. फौंडेशन, पुणे यांच्यामार्फत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी NSDC Portal वर रजिस्ट्रेशन पूर्ण केले. त्यातील काही विद्यार्थ्यांनी अँप्टीटयूड व सॉफ्ट स्कीलचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा टेलिफोनिक इंटरव्ह्यू घेण्यात आला. व त्यातून विश्रांतवाडी पुणे येथील EPIC Consulting Service या कंपनीमध्ये १६१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

या प्लेसमेंट ड्राईव्हचे यशस्वी नियोजन करण्यासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण व सदस्य प्रा. संजय थोरात, डॉ. संजय लट्ठे, डॉ. राजश्री पाटील, प्रा. विजय पुजारी, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. राहुल इंगवले, प्रा व्ही. व्ही. मिसाळ, प्रा ए एल उपाध्ये, डॉ ए आर कासारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विवेकानंद कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, २१ ऑक्टोबर २०२४

# श्रेया बरालेला तायक्वाँदोत 'सुवर्ण'



श्रेया बराले

**वडणगे :** विवेकानंद कॉलेजची खेळाडू श्रेया विश्वास बराले (रा. वडणगे) (बी.ए. भाग २) हिने १६ व १७ ऑक्टोबर रोजी जी.के.जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ किलो वजनीगटात सुवर्णपदक पटकावले. श्रेयाची १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली. तिला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

21/10/2024

21.10.24

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, २२ ऑक्टोबर २०२४

# 'कोरगावकर', 'देशमुख', 'विवेकानंद' विजेते

## महापालिकास्तर १४ ते १९ वर्षांखालील शालेय खो-खो स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : महापालिकास्तर शालेय खो-खो स्पर्धेत १४ ते १९ वर्षांखालील गटात अनुक्रमे कोरगावकर हायस्कूल, वसंतराव देशमुख हायस्कूल, विवेकानंद कॉलेज यांनी विजेतेपद पटकावले. स्पर्धा महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर झाल्या.

१४ वर्षांखालील गटात मुलींमध्ये कोरगावकर हायस्कूलने शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात आयेशा शेख, भक्ती गेंजगे, प्राची चव्हाण, धनश्री चौगुले, श्रावणी बनसोडे, श्रेया गोटडके, गौरी कर्पणी, समृद्धी इंगळे, आरोही पुजारी, जोय बेपारी, गायत्री जिरगे, वंशिका कुंजीकोरवी, क्रीडा शिक्षक सदाशिव न्हाटवळ यांचा समावेश होता.



कोल्हापूर : शालेय महापालिकास्तर खो-खो स्पर्धेत विजेतेपद पटकाविलेल्या १९ वर्षांखालील मुली व १७ वर्षांखालील मुलांच्या संघासोबत मान्यवर उपस्थित होते.

१७ वर्षांखालील गटात मुलांमध्ये वसंतराव देशमुख हायस्कूलने वसंतराव देशमुख इंग्लिश मीडियम स्कूलवर तीन विरुद्ध दोन गुणांनी मात करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात प्रेम कांबळे, प्रेम नवाळे, राज पाटील, चिन्मय पतंगे, सोहम लांबोरे, श्रीखर देसाई, दिग्विजय पाटील, साईराज कुंभार, तेजस कुंभार, पार्थ पाटील, शौर्य शेलार, वरद कुबल, पार्थ मोरे, श्रीवर्धन पाटील, क्रीडा शिक्षक रविंद्र पाटील यांचा समावेश होता.

१७ वर्षांखालील गटात मुलींमध्ये विवेकानंद कॉलेजने श्री गुरुदेव विद्यानिकेतनचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात वेदिका मोरे, आदिती अस्वले, समृद्धी पाटील, तेजस्विनी पाटील, श्रावणी लोहार, पायल पाटील, अमृता पाटील, लतिका पाटील, गार्गी सोयाम, क्रीडा शिक्षक प्रा. संतोष कुंडले यांचा समावेश होता.

१९ वर्षांखालील गटात मुलांमध्ये विवेकानंद महाविद्यालयाने महावीर महाविद्यालयाचा पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात शंकरनाग सरनाईक, अभिषेक बावडेकर, हर्षवर्धन सवतेकर, पृथ्वी रोकडे, प्रद्युम्न कांबळे, गणेश रानगे, यश सुतार, अजिंक्य जाधव, प्रज्वल भोसले, पृथ्वीराज घोडे, हर्ष जाधव, रितेश बहिरम, जयवर्धन कांबळे यांचा समावेश होता. मुलींमध्ये विवेकानंद कॉलेजने विद्यापीठ हायस्कूल व ज्युनियर कॉलेजचा पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात रिया पवार, श्रेया पाटील, मीनल व्हनकली, ऐश्वर्या दळवी, लक्ष्मी सुतार, संस्कृती कसबेकर, प्रगती पाटील, रश्मिता गौंडा, प्रियांका कोळी, सलोनी जामदार यांचा समावेश होता.

# प्रा. संदीप पाटील यांना पुरस्कार

**कोल्हापूर** : राष्ट्रीय सेवा योजना रौप्यमहोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्याकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल दरवर्षी पुरस्कार देण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रा. संदीप पाटील यांना जाहीर करण्यात आला. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. पुरस्काराबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आर.बी.जोग आदींनी अभिनंदन केले.

21/10/2024

21/10/24

लोकमत

कोल्हापूर, मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४

# लोकमत कॅम्पस क्लबच्या तायक्वांदो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



कोल्हापुरात नागाळा पार्कातील विवेकानंद कॉलेजच्या डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे मुलींच्या संघाने तायक्वांदो स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.



कोल्हापुरात नागाळा पार्कातील विवेकानंद कॉलेजच्या डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथील तायक्वांदो स्पर्धेतील लढतीत लहान मुलांनी फाईट केल्या.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकमत कॅम्पस क्लबतर्फे रविवारी घेण्यात आलेल्या भव्य तायक्वांदो स्पर्धेला मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध वजनी गटात झालेल्या या स्पर्धेत सबज्युनिअर, कॅडेट, ज्युनिअर गटातील मुले आणि मुली मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

येथील नागाळा पार्कातील विवेकानंद कॉलेजच्या डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत या स्पर्धकांनी या खेळाचा आनंद घेतला. कोल्हापूर तायक्वांदो असोसिएशनचे सचिव पद्माकर कांबळे, मनोज सातपुते यांच्या हस्ते या स्पर्धेस प्रारंभ झाला.

या स्पर्धेत सबज्युनिअर, कॅडेट, ज्युनिअर गटातील मुले आणि मुलींनी मोठ्या संख्येने भाग घेतला. रेफ्री म्हणून ओमकार मार्तंड, मनाली पाटील, शीतल शिंत्रे, प्रणव पोफाळे, महेश गवंडी, अक्षय पवार, प्रतीक गायकवाड यांनी काम पाहिले.

स्पर्धेनंतर विजेत्यांना सुवर्णपदक, रौप्यपदक आणि कांस्यपदक तसेच प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय सहभागी सर्व स्पर्धकांना कॅम्पस क्लबची वार्षिक मेंबरशिप विनामूल्य देण्यात आली. सर्व स्पर्धकांना कूपन बुक, आयकार्ड तसेच सहभाग प्रमाणपत्राचेही वितरण करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला ६४९ रुपयांची हमखास भेटवस्तूही मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

लोकमत

मंगळवार २२.१०.२०२४

# वडणगेच्या श्रेयाला तायक्वांदोमध्ये सुवर्ण

वडणगे : येथील श्रेया विश्वास बराले हिने जीकेजी कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी



विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत ४६ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. ती स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची खेळाडू आहे. तिची १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४

# प्रा. संदीप पाटील यांना एनएसएसचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रा. संदीप पाटील यांना राष्ट्रीय सेवा योजनेचा (एनएसएस) उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय सेवा योजना रौप्य महोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्याकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल दरवर्षी पुरस्कार देण्यात येतात. प्रा. पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांत सहभाग नोंदविला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन विद्यापीठातर्फे उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. शुक्रवार, दि. २५ रोजी सकाळी दहा वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे.

23/10/2024

26.10.24

26.10.24

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४

# श्रेया बराले हिला तायक्वाँदोमध्ये सुवर्ण



**वडणगे :** येथील श्रेया विश्वास बराले हिने शिवाजी विद्यापीठांतर्गत जयसिंगपूर येथे झालेल्या आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. ती स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची खेळाडू आहे. अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
शुक्रवार २५.१०.२०२४



कोल्हापुरात मनपास्तर शासकीय शालेय खो- खो स्पर्धेत १७ वर्षे मुलांच्या गटात वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूल अजिंक्य ठरले. विजेत्या संघासमवेत प्रशिक्षक.

# विवेकानंद, देशमुख, कोरगावकर अजिंक्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मनपास्तर शासकीय शालेय खो- खो स्पर्धेत १७ आणि १९ वर्षे मुले- मुलींच्या गटात विवेकानंद ज्युनिअर कॉलेज आणि १७ वर्षे मुलांच्या गटात वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूल आणि १४ वर्षे मुलींच्या गटात कोरगावकर हायस्कूल अजिंक्य ठरले. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आणि जिल्हा खो- खो असोसिएशन सहकार्याने महाराष्ट्र हायस्कूल येथे स्पर्धा झाल्या.

१४ वर्षे मुलींच्या गटात कोरगावकर हायस्कूलने शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलवर विजय मिळविला. या संघात आयेशा शेख, भक्ती गेजगे, प्राची चव्हाण, धनश्री चौगुले, श्रावणी बनसोडे, श्रेया गोटडके, गौरी कर्पणी, समृद्धी इंगळे, आरोही पुजारी, जोया बेपारी, गायत्री जिरगे, वंशिका कुंचीकोरवी होते. त्यांना सदाशिव -हाटवळ यांचे मार्गदर्शन लाभले. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात देशमुख हायस्कूल ३-२ फरकाने वसंतराव देशमुख इंग्लिश स्कूलवर मात केली. विजयी संघात प्रेम नवाळे, राज पाटील, चिन्मय पतंगे, सोहम लांबोरे, श्रीखर देसाई, दिग्विजय पाटील, साईराज कुंभार, तेजस कुंभार, पार्थ पाटील, शौर्य शेलार, वरद कुबल, पार्थ मोरे, श्रीवर्धन पाटील होते. त्यांना रवींद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. १७ वर्ष मुलींच्या गटात विवेकानंद कॉलेजने गुरुदेव विद्यानिकेतनवर मात केली. विजयी संघात वेदिका मोरे, अदिती अस्वले, समृद्धी पाटील, तेजस्विनी पाटील, श्रावणी लोहार, पायल पाटील, अमृता पाटील, लतिका पाटील, गार्गी सोयाम होते. त्यांना प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

25/10/2024

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये सुशीलादेवी साळुंखे यांना अभिवादन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये सुशीलादेवी साळुंखे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी कुटुंब, संस्था, गुरुदेव कार्यकर्ते यांच्याशी स्नेहभावाने व आईच्या मायेने प्रेम केले. सामान्यपण जपत असामान्य कर्तृत्व केले, असे मत प्रा. डॉ. संपदा टिकपुर्ले यांनी व्यक्त केले. प्रा. ए. बी. वसेकर यांनी स्वागत केले. डॉ. बी. टी. दांगट यांनी आभार मानले.

पुढारी MY कोल्हापूर
रविवार, २७ ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद महाविद्यालयाच्या अंकुश हाक्के यास क्रॉसकंट्री स्पर्धेत सुवर्णपदक

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या अंकुश हाक्के याने १० किलोमीटर अंतर तब्बल ३० मि. ४५ सेकंदात पूर्ण करत सुवर्णपदक पटकावले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

सोमवार २८ ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद कॉलेजला नॅकची 'ए प्लस' ग्रेड प्राप्त

## विवेकानंद कॉलेजला (स्वायत्त) नॅक मूल्यांकनामध्ये दैदिप्यमान यश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास १४ व १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नॅकच्या चौथ्या सायकलसाठी नॅक पिअर टीमने भेट दिली. विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक)चे ३.२९ सीजीपीए मेन 'ए प्लस' ग्रेड प्राप्त आहे. सन २०१६ मध्ये झालेल्या नॅक मूल्यांकनात ३.२४ सीजीपीए मेन ए ग्रेड मिळालेली होती. चौथ्या सायकलमध्ये नॅकचे 'ए प्लस' ग्रेड मिळवून पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी




प्राचार्य, प्राध्यापकांचे अभिनंदन केले.



नॅक पिअर समितीमध्ये प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरु प्रोफेसर बिष्णू चरण बरीक हे होते. तर समितीचे समन्वयक अलिगड मुस्लीम विद्यापीठ, उत्तरप्रदेश मधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिट्यूट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता. नॅक मूल्यांकन जाहीर होताच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्यागातून आणि ध्येयातून उभा राहिलेल्या संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेज पश्चिम महाराष्ट्रातील अग्रमानांकित आहे. कला, क्रिडा, शिक्षण, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, विवेकानंद कॉलेज शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील नेहमीच अग्रेसर कॉलेज म्हणून ओळखले जाते. गेल्या सहा वर्षात महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकाने घेतलेल्या कष्टाचे हे यश आहे. समन्वयक डॉ. श्रुती जोशी म्हणाल्या, महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये नॅक मूल्यांकन ही महत्त्वाची गोष्ट आहे. कॉलेजमध्ये प्रत्येक घटकाने घेतलेले कष्ट आणि केलेली मदत यामुळेच मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकले.

नॅक स्टेअरिंग कमिटीप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी म्हणाले, विवेकानंद कॉलेजला मिळालेल्या यशात कॉलेजमधील सर्वच घटकांचा मोठा वाटा आहे. प्रत्येक घटकांने केलेली जीवतोड मेहनत आणि कॉलेजच्या विकासात बजावलेली भूमिका यातूनच आपल्याला हे यश मिळाले आहे. या यशासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रशासकीय कर्मचारी प्रमुख हितेंद्र साळुंखे, नाईक रवी चौगुले व सर्व प्रशासकीय कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पुण्य नगरी

कोल्हापूर । सोमवार, २८ ऑक्टोबर २०२४


# स्वामी विवेकानंद कॉलेजला नॅककडून 'ए

कोल्हापूर : प्रतिनिधी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी नॅक पिअर टीमने भेट दिली. अधिकारप्रदत्त स्वायत असणाऱ्या विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) च्या 'फोर्थ सायकल'मध्ये ३.२९ 'सीजीपीए'सह 'ए प्लस' ग्रेड मिळवली आहे, तर २०१६ मध्ये झालेल्या नॅक 'थर्ड सायकल'मध्ये विवेकानंद कॉलेजला ३.२४ 'सीजीपीए'सह 'ए' ग्रेड मिळाली



प्राचार्य,
डॉ. आर. आर. कुंभार

होती. त्यानंतर महाविद्यालयाने स्वायत्त होण्याचा बहुमान पटकावला होता.

नॅक समितीचे प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरू प्रा. बिष्णू चरण बरीक हे होते, तर समितीचे समन्व्यक अलीगड मुस्लिम विद्यापीठ, उत्तर प्रदेशमधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिट्यूट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता.

या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्यागातून आणि ध्येयातून उभा राहिलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नावलौकिकात विवेकानंद कॉलेजने अजून भर घातली आहे. विवेकानंद कॉलेजने अशीच उत्तमोत्तम प्रगती करावी.

संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेज हे पश्चिम महाराष्ट्रातील अग्रमानांकित महाविद्यालय आहे. विवेकानंद




कॉलेजने कला, क्रीडा, शिक्षण, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. महाविद्यालयाच्या यशाचा हा महामेरु असाच पुढे चालत राहावा.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, महाविद्यालयाने स्थापनेपासूनच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर
कॉलेज हे
परिक्षेत्रातील
म्हणून ओव

त्याचब
समन्वयक
स्टेअरिंग कॉ
आर. कट्टीम
केले. नॅक व
आर. आर.
समन्वयक प्र
स्टेअरिंग क
आर. कट्टीम
जोग, प्रशार
हितेंद्र साळुं
विशेष परिश्र

मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४

तरुण भारत

# विवेकानंदच्या अंकुश हाक्केला क्रॉसकंट्री स्पर्धेत सुवर्णपदक

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज, कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरचा खेळाडू कु. अंकुश हाक्के याने १० किलोमिटर अंतर तब्बल ३०.मि ४५ सेकंद मध्ये पूर्ण करत सुवर्ण पदक पटकावले. सदर खेळाडूला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर.बी. जोग व श्री सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# नम्रता ढाळे यांना पीएच.डी.



नम्रता ढाळे

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातील विद्यार्थिनी नम्रता देवीदास ढाळे यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी 'मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रियांच्या बदलत्या प्रतिमेचा अभ्यास (१९३२-१९८२)' या विषयावर विवेचन करणारा प्रबंध सादर केला. चित्रपटसृष्टीतील स्त्रियांच्या समस्या याबाबत आजची सेलिब्रेटी म्हणून झालेला बदल संशोधनात अभ्यासपूर्ण भर घालणारे हे योगदान आहे. त्यांना प्रा. डॉ. कविता गगराणी यांच्यासह विवेकानंद कालेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांचे सहकार्य लाभले.

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३१ ऑक्टोबर

# विवेकानंद महाविद्यालयाला 'नॅक'चे ए प्लस मानांकन

कोल्हापूर, ता. ३० : येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेजला 'नॅक'चे (राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद) ३.२९ 'सीजीपीए'सह ए-प्लस मानांकन मिळाले आहे. कॉलेजच्या नॅक मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी नॅक पीअर टीमने भेट दिली होती.

२०१६ मध्ये 'नॅक'च्या तिसऱ्या फेरीमध्ये ३.२५ 'सीजीपीए'सह 'ए' मानांकन मिळाले होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्याग, ध्येयातून उभारालेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लौकिकात विवेकानंद कॉलेजने भर घातली असल्याची प्रतिक्रिया कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केली.

महाविद्यालयाने कला, क्रीडा, शिक्षण, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात योगदान दिले आहे, असे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी सांगितले. महाविद्यालयाला मिळालेले हे यश विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे फळ असल्याचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी सांगितले. यावेळी 'आयक्यूएसी'च्या समन्वयक प्रा. डॉ. श्रुती जोशी, नॅक स्टेअरिंग कमिटीचे प्रमुख प्रा. डॉ. एस. आर. कट्टीमनी, रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रशासकीय कर्मचारी प्रमुख हितेंद्र साळुंखे, रवी चौगुले आदी उपस्थित होते. या मूल्यांकनासाठी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, कर्मचाऱ्यांनी तयारी केली.

पुण्य नगरी

गुरुवार, ३१ ऑक्टोबर २०२४

# प्रा. नम्रता ढाळे यांना पीएच.डी.

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील प्रा. नम्रता देविदास ढाळे यांना शिवाजी विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी जाहीर प्राप्त झाली. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रियांच्या बदलत्या प्रतिमेचा अभ्यास (१९३२-८२) याबाबत विवेचन करणारा प्रबंध सादर केला. त्यांनी प्रा. डॉ. कविता गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. प्रा. नम्रता ढाळे यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. एस.आर.कट्टीमनी, रजिस्ट्रार आर.बी. जोग आदींनी अभिनंदन केले.

